



दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार ३० नोव्हेंबर २०२४ | अंक ३५६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जीवे मारण्याची धमकी, महिलेला घेतलं ताब्यात

## पोलिसांकडून तपास सुरु

**प्राथमिक तपासात महिला मानसिक दृष्ट्या अस्थिर असल्याच कळतय. स्टँडर्ड प्रोसिजरनुसार पोलिसांकडून तपास सुरु आहे. या महिलेच वय ३४ वर्ष असल्याच समजतय. महाराष्ट्रात नुकत्याच विधानसभेच्या निवडणुका झाल्या. मागच्या आठवड्यात विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. सध्या राज्यामध्ये सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु आहेत. या दरम्यान थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींना जीवे मारण्याची धमकी देणारा हा फोन कॉल आल्याने एकच खळबळ उडाली आहे.**



**मुंबई** पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षात काल रात्री एक फोन आला. हा फोन आल्यानंतर पोलीस नियंत्रण कक्षात एकच खळबळ उडाली. कारण फोन करणा-या व्यक्तीने थेट देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं नाव घेतलं. त्या कॉलरने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जीवे मारण्याचा कट रचल्याची धमकी दिली. बुधवारी रात्री ९ च्या सुमारास नियंत्रण कक्षाला धमकीचा हा फोन आला. मोदींना मारण्याचा कट सुरू असून वेपनची तयारी झाल्याची माहिती फोन करणा-या व्यक्तीने दिली. या घटनेची मुंबई पोलिसांनी गंभीर दखल घेतली आहे. मुंबई पोलिसांनी तातडीने फोन करणा-या व्यक्तीचा शोध सुरु केला आहे. यामध्ये कॉल करणारी व्यक्ती एक महिला असल्याचा दावा करण्यात येतोय. या कॉल प्रकरणी शितल चव्हाण नावाच्या महिलेला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.या प्रकरणी मुंबईच्या आंबोली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. प्राथमिक तपासात महिला मानसिक दृष्ट्या अस्थिर असल्याच कळतय. स्टँडर्ड प्रोसिजरनुसार पोलिसांकडून तपास सुरु आहे. या महिलेच वय ३४ वर्ष असल्याच समजतय. महाराष्ट्रात नुकत्याच विधानसभेच्या निवडणुका झाल्या. मागच्या आठवड्यात विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. सध्या राज्यामध्ये सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु आहेत. या दरम्यान थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींना जीवे मारण्याची धमकी देणारा हा फोन कॉल आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

## सध्या कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी कोणाकडे?

महाराष्ट्रात सध्या राज्यपालांनी काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्याकडे जबाबदारी सोपवली आहे. मंगळवारी एकनाथ शिंदे यांनी राज्यपालांना भेटून मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सोपवला. नवीन सरकार अस्तित्वात येईपर्यंत एकनाथ शिंदे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून राज्याचा कारभार पाहतील. यात कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपली.

## आ. विजयसिंह पंडित यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची भेट



**गेवराई। प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील नवनिर्वाचित आमदार विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी विजयसिंह पंडित यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या विधानसभा निवडणुकीतील यशानंतर आ. विजयसिंह पंडित यांनी आज आंतरवली सराटी येथे जाऊन मराठा संघर्ष योद्धा मनोज जरराग पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. शिवछत्र परिवाराच्या बतीने आ. विजयसिंह पंडित यांनी मनोज जरागे पाटील यांचा सत्कार केला. यावेळी त्यांनी जरागेणे पाटील यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करून





लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी राजेंद्र गोरे सर यांची निवड झाल्याबद्दल पाटोदा नगरपंचायत च्या वतीने शुभेच्छा देऊन सत्कार करताना आला.यावेळी उपस्थित नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव , सभापती, नगरसेवक, कर्मचारी व मित्रपरिवार व मोठ्या संख्येने उपस्थित होते

## युवकांनी नवं नवीन उद्योगात उतरावे - राजेंद्र मस्के
## मोहिनिनाथ अर्थमुहर्सचा शुभारंभ संपन्न..!

**( बीड प्रतिनिधी )**

वाढती बेकारी आणि नोकऱ्यांचा तुटवडा लक्षात घेता तरुणांनी व्यवसाय उद्योगाकडे वळावे. गरज ही शोधाची जननी असून युवकांनी आपल्या परिसरात जनतेला आवश्यक असणाऱ्या विविध गरजांचा अभ्यास करून नव नवीन उद्योगात उतरून स्वावलंबी झाले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे नेते, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी मोहिनिनाथ अर्थमुहर्स शुभारंभ प्रसंगी व्यक्त करून, उपसरपंच लालासाहेब पन्हाळे व विलास काकडे यांना शुभेच्छा दिल्या.

बोरफडी गावचे उपसरपंच लालासाहेब पन्हाळे व जरुड येथील युवा कार्यकर्ते विलास काकडे यांनी जेसीबी (पोकलेन) मशीनच्या माध्यमातून नवीन व्यवसायाला सुरवात केली. आज जरुड फाटा येथे मोहिनिनाथ अर्थमुहर्सचा शुभारंभ गोरक्षनाथ टेकडीचे महंत नवनाथ बाबा महाराज, भवानीगड संस्थानचे महंत अखंडानंद गिरी महाराज, जरुड संस्थानचे महंत नवनाथ महाराज यांच्या शुभहस्ते व शेतकरी मित्र राजेंद्रजी मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी धनंजय गुंदेकर, पोपटराव शेंडगे, विजय सुपेकर, सुनील कुटे,



कल्याण कुटे, विकास कुटे, सतीश काकडे, तौर महाराज, सरपंच श्रीराम काकडे, उपसरपंच पंजाब काकडे, सरपंच संदीप डावकर, विष्णू निर्मळ, सुधाकर मोरे, बाबा जगताप, सुरेश माने, बद्रीनाथ जटाळ, उपसरपंच अमोल खामकर, सरपंच राजेंद्र राऊत, सरपंच अशोक शिंदे, शामराव मोरे, विठ्ठल काळे, सुरेश काकडे, जालिंदर काकडे, सखाराम शिंदे, नंदकिशोर कदम यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील नागरिक मोठ्या संखेने उपस्थित होते.

## ग्राम महसूल अधिकारी बाबुराव शिंदे यांना नालंदा ऑर्गनायझेशनकडून पुरस्कार



**प्रतिनिधी बीड** दि.२९ : केज तालुक्यातील होळ येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) बाबुराव काशिनाथ शिंदे यांना पुणे येथे नालंदा ऑर्गनायझेशनकडून ङ्गराज्यस्तरीय आदर्श ग्राम महसूल अधिकारी पुरस्कारफ देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.

बाबुराव शिंदे मूळचे होळ येथील असून त्यांनी गेली अनेक वर्ष पुणे जिल्ह्यात महसूल विभागात ग्राम महसूल अधिकारी पदावर काम केले आहे. गेल्या काही वर्षांपासून ते केज तालुक्यात कुंबेफळ येथे कार्यरत आहेत. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन नालंदा ऑर्गनायझेशनकडून पुणे येथील कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे ऑनलाईन अर्जासाठी १६ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**बीड, दिनांक २८ : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता ११ वी व त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही,** अशा विद्यार्थ्यांना घरभाडे व इतर खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षापासून ही योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी **https://hmas.mahait.org** या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत १६ डिसेंबरपर्यंत वाढविली आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह ऑनलाईन पद्धतीने विहित मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे.

*********************

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ३० नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# ईव्हीएमचा वितंडवाद

महाराष्ट्रात नुकतीच विधानसभेची निवडणूक आटोपली. त्यातील निकाल स्तिमित करणारे होते. विरोधी पक्ष तर सोडाच, पण सत्ताधारी पक्षही निकालांनी आश्चर्यचकित झाले. या एकूण निकालाने विरोधक मोडकळीस आले आहेत. जगातील सर्वांत मोठा लोकशाहीवादी देश म्हणून भारताच्या प्रत्येक गोष्टीचे सदैव कौतुक होते. विशाल लोकसंख्येमुळे आपले सारेच काम भव्य असते. या भव्यतेत देशातील शेवटच्या माणसाचा विश्वास जिंकण्याचे काम खरेच होते काय, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. लोकशाहीच्या उदार तत्त्वांमध्ये शंकांना स्थान नसते... नसावे. महाराष्ट्रात नुकतीच विधानसभेची निवडणूक आटोपली. त्यातील निकाल स्तिमित करणारे होते. विरोधी पक्ष तर सोडाच, पण सत्ताधारी पक्षही निकालांनी आश्चर्यचकित झाले. या एकूण निकालाने विरोधक मोडकळीस आले आहेत. विरोधीपक्षनेतेपदही त्यांना मिळणार नाही, अशी राज्यात अवस्था आहे. त्याचवेळी, भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वात नवे सरकार आरुढ होणार, हे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडलेल्या भूमिकेमुळे स्पष्ट झाले. एकीकडे सत्ताधारी पक्ष एकसंध होत असताना, विरोधी पक्षांना मात्र एकत्रित आणणारा मुद्दा समोर नव्हता. पुढील पाच वर्षे एकत्र काढायची असतील, तर ङ्गकिमान समान कार्यक्रमम लागतो. ङ्गईव्हीएमम अर्थात इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनने विरोधी पक्षांना पहिला समान कार्यक्रम दिला, असे म्हणता येईल. ङ्गईव्हीएममुळे आम्ही हरलोफ, हा पराभूतांचा दावा नवा नाही. प्रत्येक निवडणूक झाली की तो नव्या त्वेषाने पुढे येतो. खरेतर सन २०१७मध्ये निवडणूक आयोगाने ईव्हीएमविषयीच्या शंका सिद्ध करण्याबद्दल दिलेली संधी विरोधकांना पेलता आली नव्हती. आता उरलेली पत सांभाळायची असेल तर ईव्हीएमला तीव्र विरोधाखेरीज पर्याय नाही हे दाहक तथ्य विरोधी पक्षांना उमगले आहे. आंदोलने विसरलेला पक्ष तसाही लोकविस्मृतीत जातो. बळकट बहुमतानंतर सत्ताधाऱ्यांमधील विसंवाद वाढेल, हा विरोधकांचा तर्क काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बुधवारच्या पत्रकार परिषदेमुळे मोडीत निघाला. बहुमत मिळाल्यानंतरही नेत्यांची निवड लाबंली, तर काय होते याचा अनुभव राज्याने यापूर्वी घेतला आहे. ती अनागोंदी आणि परराज्यवारी टळली याबद्दलचा निःश्वास यंदा राज्यातील जनतेने नक्कीच सोडला असेल. अशा वेळी ईव्हीएमचा मुद्दा मुठीतून निसटू न देण्याचा विरोधकांनी पण केलेला दिसतो. त्याविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा निर्णय विरोधी पक्षांनी घेतला आहे. तिकडे उत्तर प्रदेशात यापुढे कोणतीही पोटनिवडणूक न लढण्याचा निर्णय घोषित करून बहुजन समाज पार्टीच्या सर्वेसर्वा मायावती यांनीही ईव्हीएमविरोधात रणशिंग फुंकले. हरियाणा घेताना जम्मू–काश्मीर द्यायचे आणि महाराष्ट्र घेताना झारखंड द्यायचे ही भाजपची राजकीय रणनीती असल्याचाही आरोप विरोधकांनी केला आहे. न्यायालयाने मात्र याविषयी स्पष्ट मत नोंदविले. ङ्गजिंकता तेव्हा ईव्हीएम हॅक होत नाही कायफ, असा खडा सवाल करीत सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएममधील फेरफारीचा आरोप आणि त्या संदर्भातील याचिका फेटाळून लावली. इतर देशांत मतपत्रिकांवर मतदान होते, हा याचिकाकर्त्याचा दावा तर न्यायालयाने ङ्गजगापेक्षा वेगळे असावे असे का वाटत नाहीफ, असा प्रतिप्रश्न करीत निकालात काढला. आधी देशातील मतपत्रिकांसाठी दहा हजार टन कागद लागायचा. प्रकाशन, वितरणाचा खर्च मोठा होता. देशात सर्वप्रथम १७ लाख ५० हजारांहून अधिक ईव्हीएम उपयोगात आणले गेले. सन २००४मध्ये चौदाव्या लोकसभेसाठी ईव्हीएमचा प्रयोग झाला. सन १९८२मध्ये केरळ विधानसभेसाठी ईव्हीएमद्वारे मतदानाचा पहिला उपक्रम राबविण्यात आला, मात्र त्यावेळी कायदा नसल्याने सर्वोच्च न्यायालयातील आव्हानानंतर ती प्रक्रिया रद्दबादल ठरविण्यात आली. २००४नंतर सर्व निवडणुका ईव्हीएमनेच होत आल्या आहेत. ईव्हीएमला पुढे व्हीव्हीपॅट जोडण्यात आले. आपण दिलेले मत सात सेकंदांसाठी त्यात दिसते. ते बघून सुरक्षित मतदान झाल्याची खात्री करता येते. भारतासारख्या वि शालकाय देशात निष्पक्ष निवडणुकांच्या समन्वय आणि सूसुत्रतेसाठी ईव्हीएमपेक्षा दुसरी प्रभावी पद्धत नसल्याचा निर्वाळा न्यायालयांनी वेळोवेळी दिला आहे. सन २००९मध्ये ईव्हीएमवर पहिले आरोप केले ते तेव्हाचे भाजप उमेदवार लालकृष्ण अडवाणी आणि तत्कालीन जनता पार्टीचे नेते सुब्रमण्यम स्वामी यांनीच. भाजप नेते जीव्हीएल नरसिंहराव यांनीही या प्रणालीविषयी प्रश्नचिन्ह उभे केले होते. सुब्रमण्यम स्वामी यांनी तर न्यायालयाचे दार ठोठावले. आज भाजपच ईव्हीएमचा कट्टर समर्थक आहे. देशातील याबाबतच्या शंकेचे वातावरण नाहीसे व्हायला हवे. न्यायालयाने असे मुद्दे सोडविण्याबद्दल अलिप्तता जाहीर केल्यामुळे ईव्हीएमचा मुद्दा तसा निकालात निघाला आहे. याउपरही हवे असल्यास केंद्राच्या पुढाकारातून सर्वपक्षीय समितीद्वारे त्यावर चर्चा सहज शक्य आहे. त्यासाठी विरोधकांनाही चर्चेच्या पातळीवर यावे लागेल. लोकशाहीतील या उदारतेसाठी विरोधक तयार आहेत काय, हे बघणेही तेवढेच महत्त्वाचे

# संस्कारी दाम्पत्य जीवनानुभवाचा आदर्श परिपाठ परिसस्पर्श

साहेबराव नंदन तात्या यांची परिसस्पर्श कांदबरी नुकतीच वाचनात आली. पहिल्या गावगाडा काव्य संग्रहानंतर आलेली ही पहिलीच नविन कादंबरी तथापि नवखेपणा कुठेच जाणवत नाही. परिसस्पर्श ही कांदबरी व्यक्तीगत मूल्यभावांशी निगडित आहे,एका त्यागी, परोपकारी, संवेदनशील वृत्तीची नायिका हीकेंद्रस्थानी ठेवून परिवर्तन घडवून आणणार्या कथेतील नायिकेच्या जीवनमूल्यांची शिकवण दृगोचर करणारी, प्रांजळ वास्तवदर्शी चित्रण असलेली साहित्यकृती म्हणून नक्कीच पहाता येईल . कादंबरीचे कथानक पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन भागात विभागले आहे. पहिल्या भागात बालपण, माहेर,आजोळ तर दुसर्या भागात नायिकेच्या सासुरवाशीन दांम्पत्यजीवनातील कष्टप्रद प्रवास, नवरा–बायको नात्यातील स्नेह, जीवनसाथी सोबत असलेले आपुलकीचे अनुबंध, निष्ठा, विश्वास, सामाजिक जान –भान, परोपकारी कोंदणात तावून सुलाखून निघालेले प्रेरणादायी कृतार्थ आयुष्य.अस्सल खान्देशी ग्रामीण बाज, सामाजिक तत्कालीन, सम कालीन बदलांच्या अनुषंगाने बदललेल्या चालीभाती, रुढीरिवाज,सण सोहळे व सांस्कृतिक स्पंदनातून आलेले कथानक या अर्थी सामाजिक वास्तवाचा धांडोळा घेतला आहे. समाजाचे प्रतिबिंब साहित्यकृतीत दिसते ह्याची प्रचिती वाचताना येते.ओघवते निवेदन कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणता येईल. लेखकाने तृतीय पुरुषी निवेदनाद्वारे हे स्वः ता सर्वच प्रसंग, घटनांतील एक घटक, साक्षीदार असल्यागत प्रभावीपणे एका शिक्षिकेची संघर्षमय कहाणी समाजापुढे ठेवली आहे.सौ. पुष्पलता संभाजी पगारे हि सत्शील नायिका वास्तवाच्या खडकावर खडतर प्रवास करीत आदर्शवत बनून राहिली आहे . अशी व्रतस्थ शिक्षिका,जिचा विवाह नवव्या वर्गात असताना आपल्या पेक्षा वयस्क, उच्च शिक्षित तरुणाशी होतो.नंतरचा वैवाहिक जीवनाचा हा पट आजच्या कोलमडत चाललेल्या कुटुंब व्यवस्थेसाठी दीपस्तंभ ठरला आहे. विकृत सांस्कृतिक स्थित्यंतरात ढासळत जाणा–या निती–मूल्यांची जपणूक करण्यासाठीचे यथार्थ दिशादर्शन करणारी परिसस्पर्श ही समाजाभिमुख कांदबरी आहे,फ्प्रती परिस होउन जेव्हा पत्नीच्या आयुष्याचं सोनं करतोफ महा कर्म योग वर्तमानात अभावानेच आढळतो अशाच परिसस्पर्शामुळे पुष्पलता ताईचा जीवनात आमूलाग्र बदल होतो,हे सत्य नायिकेच्या मनोतरंगातून अंकीत झालेले प्रत्ययास येते मला घडवलं,मढवलं, माझ्या सौभाग्याच्या परिसाने.ङ्घ ही कांदबरी निश्चितच तुम्हाला माझ्या गतयुष्यात घेऊन जाईल यात तीळमात्र शंका नाही. नायिकेची ही स्वानुभवाची शिदोरी पुढच्या





पिढीला प्रेरणा देणारी आहे म हे रेखाटण्यात साहेबराव नंदन तात्या पुर्णतः यशस्वी झाले आहेत. हे तेवढेच खरेकादंबरीतील सहनायकाची भूमिका तितकीच आश्वासक अनिवार्य व महत्वपूर्ण असून क्रांतीसाऊ, महात्मा फुले यांच्या सत्यशोधक, परिवर्तन विचारांना आदर्श मानून स्त्री समानता, स्त्री सन्मान व गौरवाचा मॉडेल वस्तूपाठ, आधी केले,मग सांगीतले या उक्तीप्रमाणे समाजात घालून दिला आहे .नववी इयेत्तेत शिकलेल्या आपल्या सह धर्मचारिणीला संसार रहाटगाडग्यात खितपत पडू न देता उच्च शिक्षित करून शैक्षणिक संस्थेच्या सचीव पदी नेऊन ठेवले आहे. मिळालेल्या संधीचे सोने करत ताई हजारो अनाथ, आदिवासी मुलांच्या तारणहार झाल्या, अडल्या– नडल्यांना मदतीचा हात दिला. ॲड संभाजी पगारे, बापूंच्या कार्यकर्तृत्वाचा आदर्श हा कर्ते सुधारकांच्या जातकुळीचा असल्याने माईलस्टोन ठरणारा आहे.ही कांदबरी साहित्यिक व सामाजिक अंगाने अग्रणी ठरते म कादंबरी हा खूप मोठा भाषिक आवाका असणारा वांगयम प्रकार आहे. कादंबरीतील भाषा ही घटना, प्रसंग व पात्रा नुकूलअसून पर्याप्त निवेदन शैलीचा इम्पॅट साधत लेखक वाचकांची उत्कंठा शिगेला नेऊन सोडतो. ग्रामीण भाषाभ्यास, समर्पक बोली भाषेचा वापर व परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण कांदबरीचे सौंदर्य स्थळं द्वीगुणीत करते या अनुषंगाने लेखक गावगाडा संस्कृती चे पाईक असून, ग्रामीण जीवनाचे अविभाज्य भाग आहेत.

कोण गावं परणाले जाशी रे मना म नीकडा,? कोकलंपरणाले जाशी रे मना मनीकडा. ही खानदेशी लगीन गाणी, लगीन घाई, गावातील विधींशी निगडीत –बेळम थणी,कोयत पोयत,काकण, देव उजळते, मुर्हाळी,मांडव,सुतवणी,, कट्यार,सुपडे बाशिंग हे शब्द कथानक जीवंत ठेवतात, व गतवैभवात नेतात.दामोधरी, नाडी पायजमा, चिरामूंदी,तोडे ,येल्या,झुब्बा,झंपर, झबलं जोडवा फिंद्री लाजाहोम,झालझेंडा, दगडी चिरा इत्यादी लोप पावत चाललेल्या शब्दांच्या चपखल वापरातून सत्य कथानकाधारीत कादंबरी कल्पक, रंजक वाटू लागते. अहिराणी भाषेतील शब्द सौंदर्य जपणार्या साहेबराव नंदन तात्या यांचा गौरव उचित ठरतो . परिसस्पर्शमधील सामाजिक चित्रण वास्तवदर्शी आहे. नवागाव, जूनागाव, वाड्यावस्त्यांतील रहिवास, व्यापारी– मापारी, बलुतेदार– अलुतेदार सर्व जातीधर्माचा एकोपा,गावकी भावकी, गणगोत, सगेसोयरे मित्रपरिवार नातेवाईक हा सामाजिक लवाजमा विस्तृतपणे कादंबरीत टीपला आहे.नायक– नायिका यांचा लग्नं समारंभ बारकाव्यांमुळे वाचताना प्रत्यक्षात उभा राहतो, वाचक सोहळ्यातला एक वर्हाडी होऊन जातो एवढ्या ताकदीने मांडणी केली आहे .सभोवतालची पात्र – रखमा, दगडू आप्पा, लक्ष्मण दादा, म ठीमाय, बेबी , आजी ,मुक्ता माय, यशवंत आण्णा ही सर्वच पात्रं पेहराव, स्वभावविशेष व व्यक्तिगत गुणदोषामुळे जीवंत वाटतात. निवेदनातील सहजता, साधेपणाने वाचक त्या त्या घटना ,प्रसंगात तादात्म्य पावतो. एकरूप होउन जातो ह्या पुष्य्थर्थ चिरामुंदीचा कार्यक्रम, हळद सांजसंध्या पाचवी पूजन, मांडव सुतवणी, शेवंती व सेवानिवृत्ती सम रंभ ही उदाहरणे नोंद घेण्याजोगी आहेत म साहेबराव नंदन तात्या हे बहुआयामी व्यक्तिम त्त्व असून, आपल्या लेखनातून सामाजिक परिवर्तनाची स्पंदन व स्थित्यंतरे सातत्यपूर्ण मांडताना दिसतात. भाषण, प्रवचने ह्यातून आध्यात्मिक जागर करीत असतात स्त्री प्रधान कांदबरीत पुरुष प्रधानतेचे वर्चस्व कुठेच जाणवत नाही खरंतर शीर्षकातच पुरुष प्रधानतेचे वर्चस्व एक जीवनसाथी म्हणून अटळ, अनन्यसाधारण परिसस्पर्शी असूनही याचा फारसा प्रभाव जाणवत नाही. याची दखल राजेंद्र आण्णा गवळी यांनी प्रस्तावनेत घेतलेली दिसते. अनुराधा कावरखे यांचे आशयसंपन्न, संकर्षित मुखपृष्ठ वाचकांचे लक्षवेधण्यास्तव सक्षम ठरले आहे.अतिशय सुबक मांडणी, वाचनीय टाईप सेंटीग असलेली साहित्यकृती ज्ञिनसिंधू प्रकाशनाने उपलब्ध करून दिली.एकंदर, नायिका प्रधान धाटणीच्या कादंबरीत चारित्र्य, संस्कार,व निती म ूल्य शिकवण अधोरेखित होते संस्कारी दांम्पत्य जीवनानुभवाचा आदर्श परिपाठ म्हणजे परिसस्पर्श. ह्या कसदार कादंबरीचे रसिक, वाचक स्वागत करतील अशी आशा बाळगतो. बंधुप्रिय साहेबराव नंदन तात्या यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीसाठी आभाळभर शुभेच्छा!!!!

समीक्षक: विद्रोही कवी साहेबराव मोरे
मो ९४०४०४८६०१
परिसस्पर्श: कादंबरी
लेखक: साहेबराव नंदन
प्रकाशन:ज्ञानसिंधू नाशिक
किंमत:₹ २००/

**. टिपः विशेष म्हणजे परिसस्पर्श कांदबरीस माणूसकी मल्टीपर्पज फाऊंडेश मलकापूर जि. बुलडाणा यांचा राज्यस्तरीय निळूभाऊ फूले साहित्य गौरव पुरस्कार २०२५ नुकताच जाहिर झाला आहे.**

# जातीय व्यवस्था वर्णभेदावर आधारित नाटक : युगयात्रा



६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेतील आज दिनांक २८/११/२०२४ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटी मिलिंद कला महाविद्यालय नागसेवन छत्रपती संभाजीनगर निर्मित प्राचार्य म.भि. चिटणीस लिखित शेख असलम युनूस दिग्दर्शित युगयात्रा हे दोन अंकी मराठी नाटक सादर झाले.


युगयात्रा या शब्दाचा अर्थ असा की, हजारो वर्षापासून चालत आलेल्या युगांचा प्रवास होय.

कथानकात अगदी रामयुगापासून ते आजपर्यंत चालत आलेल्या युगांचा प्रवास दाखवण्यात आला. नाटकातील कथानकात जातीय व्यवस्था,वर्णभेद यावर भाष्य करण्यात आले. नाटकात अनेक युगाचा प्रवास दाखवल्यामुळे अनेक वेगवेगळे प्रसंग दाखवण्यात आले. त्यामुळे नाटकातील पात्र संख्या ही जास्त असल्याने काही कलाकारांना दोन ते तीन पात्रे सादर करावी लागली. अनेक पात्रे व वेगवेगळे प्रसंग दाखवताना दिग्दर्शकाची चांगलीच दमछाक झालेली दिसते. पुरातन काळातील अनेक प्रसंग दाखवल्याम ुळे रंगभूषा, वेशभूषा ही त्या पात्रांना साजिशी होती. नेपथ्य सतत बदलत असल्याने नेपथ्य बदलताना व सेट करताना स्टेज मागील कलाकारांची खूप धावपळ उडाली. नाटकाच्या पार्श्व संगीताने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले, ध्वनी योजनेत अनेक त्रुटी जाणवल्या,यामुळेच नाटकाचा म ध्यांतर खूप जास्त वेळ झाला. काही कलाकारांची संवाद फेक करताना गडबड झाली. पात्र जास्त असल्याने संवाद फेक, कलाकारांची एन्ट्री याची अजून तयारी दिग्दर्शकानी करून घेणे अपेक्षित होते. जातीय व्यवस्था व वर्णभेद या सामाजिक प्रश्नावर लेखक व दिग्दर्शक यांनी भाष्य केले. यामुळे अनेक युगाचा इतिहास डोळ्यासम ोर आला. चोखा महार हे पात्र प्रेक्षकांना लक्षवेधी ठरले.प्रेक्षकांना नाटकात खेळून ठेवण्यास काही प्रमाणात दिग्दर्शक व कलाकारांना यश आल्याचे दिसून येते.प्रेक्षकांचा नाटकाला चांगला प्रतिसाद मिळाला.

**नाट्य समीक्षक उल्हास सुधीर देशपांडे**
**छत्रपती संभाजीनगर**

# कायद्याची पायरी - एक अभ्यासपूर्ण विवेचन

कायदा हा केवळ न्यायव्यवस्थेचा आधारच नाही, तर तो समाजात सुव्यवस्था निर्माण करणारा आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा एक म हत्त्वाचा घटक आहे. फ्कायद्याचे ज्ञान नसल्यास व्यक्ती आपल्या मूलभूत हक्कांपासून वंचित राहू शकते आणि त्याचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. अन्याय, शोषण, आणि फसवणूक टाळणे कठीण होईल. कायद्याचे पालन न केल्याने शिक्षेला सामोरे जावे लागू शकते. समस्यांचे योग्य तोडगे शोधण्यासाठी आणि न्याय मिळवण्यासाठी अडचणी येऊ शकतात. समाजात सुव्यवस्था आणि शिस्त राखणे कठीण होईल, कारण नागरिक त्यांच्या जबाबदा–यांची जाणीव ठेवणार नाहीत.म्हणूनच, कायद्याचे ज्ञान प्रत्येक व्यक्तीसाठी अत्यंत म हत्त्वाचे आहे, कारण ते त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि कर्तव्यांची जाणीव करून देण्यासाठी उपयुक्त ठरते. आपल्या अधिकारांचा गैरवापर टाळण्यासाठी तसेच गुन्हा रोखण्यासाठी कायद्याचे ज्ञान आवश्यक आहे. सामाजिक सुव्यवस्था राखण्यासाठी, कायद्याचे पालन आणि अज्ञानाम ुळे होणारे नुकसान टाळता येते. व्यक्तीला कायदेशीर मार्गाने आपल्या समस्या सोडवता येतात. न्यायव्यवस्थेचा योग्य उपयोग करून घेण्यासाठी कायद्याचे प्राथमिक ज्ञान आवश्यक आहे. हा समाजातील प्रत्येकाला सम ान हक्क आणि सुरक्षा सुनिश्चित




करण्यासाठी उपयुक्त ठरतो. यामुळे नागरिक जबाबदारीने वागतात आणि समाजातील न्याय प्रस्थापित होतो.

या वस्तुस्थितीची जाणीव बाळगत, सामाजिक जबाबदारी म्हणून प्रा. दीपक सोनवणे संपादित म धावते नवनगर म या दैनिकामध्ये म कायद्याची पायरी म या नावाने लेखिका ॲड.. सुनिता सोनवणे यांनी याच विषयावर आपले अभ्यासपूर्ण सदर लेखन सुरू केले जे अल्पावधीतच वाचकप्रिय झाले. याच सर्व लेखांचे संकलन असलेले शारदा प्रकाशन तर्फे प्रकाशित, लेखिका ॲड.. सुनिता साबळे लिखित आणि प्रा. ॲड.. दीपक साबळे संपादित ङ्गकायद्याची पायरीङ्घ हे पुस्तक वाचकांच्या भेटीला येत आहे. ह्या पुस्तकात विविध कायद्यांच्या सखोल चर्चेसह, त्यांचे सम ाजातील महत्त्व आणि त्यांच्या प्रभावांची विस्तृत माहिती उपलब्ध करून दिली आहे.

हे पुस्तक कायद्याच्या विविध शाखांविषयी विस्तृत भाष्य करते, जसे की महिला आणि बालकांचे अधिकार, शिक्षणाचा हक्क, सामाजिक न्याय, आणि गुन्हेगारी न्यायव्यवस्था. या मुद्द्यांवर सखोल विचारमंथन करून लेखिकेने वाचकांसाठी कायद्याचे मूलभूत ज्ञान सहजपणे उपलब्ध करून दिले आहे.

पुस्तकात कायद्याचे स्वरूप, त्याचा इतिहास आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत त्याचा उपयोग यावर माहिती तर दिली आहेच. पण त्याच बरोबर विविध विशिष्ट कायद्यांचे परीक्षण करण्यात आले आहे, उदाहरणार्थ:

महिला अधिकार संरक्षणासाठीचे कायदे: कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, मातृत्व लाभ कायदा, आणि अन्य संरक्षणात्म क कायद्यांची चर्चा.

बालकांचे कल्याण आणि शिक्षणाचे कायदे: बालमजुरी प्रतिबंधक कायदा आणि शिक्षणाचा हक्क कायद्यावर सविस्तर माहिती.

गुन्हेगारी कायद्यांवरील चर्चा: मानवी तस्करी, लैंगिक गुन्हे, आणि इतर गुन्ह्यांविरुद्धचे कठोर कायदे.सामाजिक न्याय आणि सुधारणा: बालमजुरी, मुलांचे शोषण, आणि त्यांच्यासाठी असलेल्या संरक्षणात्मक कायद्यांवर चर्चा आहे.

लेखिकेने कठीण कायदेशीर संकल्पना सोप्या भाषेत मांडल्या आहेत, जेणेकरून सामान्य वाचक देखील त्या सहजपणे समजू शकतील. या पुस्तकाच्या माध्यम ातून वाचकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे,सामाजिक व न्यायव्यवस्थेसाठी कायद्याचा उपयोग स्पष्ट करणे, कायद्याच्या वेगवेगळ्या मुद्द्यांवर सखोल चर्चा करणे हा लेखिकेचा उद्देश आहे. पुस्तकाची शैली अत्यंत माहितीपूर्ण व अभ्यासू स्वरूपाची आहे. कायद्याचे तांत्रिक मुद्दे सुलभ भाषेत मांडलेले आहेत. प्रत्येक विषयाचे वर्गीकरण व्यवस्थित आहे, त्यामुळे वाचकांना समजायला सोपे जाते. कायद्याच्या प्रत्येक पैलूवर विचार करण्यास प्रवृत्त करणारे असे ङ्गकायद्याची पायरीङ्घ हे केवळ कायद्याची यादी सांगणारे पुस्तक नसून सामाजिक जाणिवा जागृत करणारा ग्रंथ आहे. विद्यार्थी, वकील, सामाजिक कार्यकर्ते आणि कायद्याबद्दल रुची असलेल्या प्रत्येकासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल.

माहितीपर असे म कायद्याचे परीक्षण म हे पुस्तक सर्व प्रमूख पुस्तकालयात उपलब्ध आहे. न मिळाल्यास अवश्य संपर्क साधावा.

–

प्रा.प्रज्ञा पंडित
लेखिका समीक्षक
ठाणे
९३२०४४१११६

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ३० नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# कोट्यवधींची प्लॉट विक्री धारकाचा शासकीय कामांच्या फलकावर डल्ला ;

## विनापरवाना वृक्षतोड प्रकरणात वनविभागाचे दुर्लक्ष :- डॉ.गणेश ढवळे




**लिंबागणेशः-** ( दि.२९) बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद व नगर परिषद कार्यालयामार्फत जिल्ह्यात होत असलेल्या कामांचे उद्घाटन व लोकार्पण फलक कामाच्या ठिकाणी लावणे बंधनकारक असते.या फलकावर काम कोणत्या विभागामार्फत करण्यात येत आहे, कामांसाठीचा निधी तसे काम कोणत्या कंत्राटदारांच्या कंपनी मार्फत करण्यात येत आहे तसेच काम सुरू करण्याचा व काम पूर्ण झाल्याचा दिनांक या फलकावर नमुद करण्यात आलेला असतो. मात्र या फलकांवर सुद्धा डल्ला मारल्याचा प्रकार प्लॉट विक्री धारकाकडून करण्यात आला असुन अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश येथील हॉटेल सांज गारवा शेजारी भालचंद्र नगर नावाने प्लॉट विक्री सुरू असून प्लॉट विकली धारकाने त्याठिकाणी लावण्यात आलेला फलक हा सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषदेच्या सिमेंट नाला बंधा-यावरील असुन त्यावर कलर करून लावण्यात आला आहे.परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाव पुर्णपणे पुसले न गेल्याने नाव ठळकपणे दिसून येत आहे. प्लॉट विक्री करणा-या मालकाने शासकीय फलकावर डल्ला मारावा हा विषय चर्चेला बनुन राहिला आहे.

विना परवाना आंब्याच्या झाडांची वृक्षतोड; वनविभागाचे दुर्लक्ष :- डॉ. गणेश ढवळे तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दि.१२ जुलै अर्थ संकल्प २०२४-२५ दरम्यान लक्ष्यवेधी प्रश्नाला उत्तर देताना महाराष्ट्र वृक्षतोड ( नियमन) अधिनियम १९६४मधील कलम ४ मध्ये दुरुस्ती करून विना परवाना वृक्षतोड प्रकरणात सुरूवातीला १००० रूपये दंडाची रक्कम वाढवून ५० हजार रुपये दंडाची रक्कम आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.निसर्गाचा -हास थांबविण्यासाठी पर्यायाने पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी वन विभागाकडून कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे तसेच वृक्षतोड करून अवैध वाहतूक केल्यास १९२७ चे कलम ४२ नुसार सदर वाहन व साहित्य जप्त करून १ वर्ष कारावास किंवा ५००० रूपये दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.मात्र वनविभागातील अधिकारी आणि जिल्हा प्रशासन केवळ कागदी घोडे नाचवण्यात व्यस्त दिसून येत आहे. जिल्हा प्रशासनाला याचे गांभीर्य नसुन नियम केवळ कागदावरच असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

# नेकनूर स्त्री रुग्णालय खासगी लॅब वाल्याचे खिसे भरण्यासाठीच का? अनेक वेळा तक्रार करूनही वैद्यकीय अधीक्षक शांतच का?

## खासगी लॅब वाला डॉक्टरांना जेवणाच्या डब्याबरोबर आणखी काय काय पुरवतो? खाजगी लॅब वाला रुग्णालयतच रात्रंदिवस तळ ठोकून ?




**नेकनूर प्रतिनिधी** - नेकनूर चे स्त्री रुग्णालय म्हणजे बालाघाटावरील रुग्णांना एक सर्व सुविधा देणारे रुग्णालय म्हणून परिचित आहे या ठिकाणी महिलांच्या शस्त्रक्रियेबरोबरच इतरही शस्त्रक्रिया अगदी मोफत केल्या जातात. परंतु, मागील काही महिन्यांपासून या ठिकाणी येणा□या रुग्णांना रक्त तपासण्या करण्यासाठी बाहेरच्याना आमंत्रण दिले जाते. यामुळे या ठिकाणी मोफत सुविधा असूनही खासगी लॅब वाल्याला भरमसाठ पैसा डॉक्टर मार्फत मिळवून दिल्याची चर्चा ऐकावयास मिळत आहे. याबाबत वैद्यकीय अधीक्षक यांना सांगूनही हा प्रकार काही थांबत नसल्याचे पहावयास मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून खाजगी लॅब वाला रात्रंदिवस त्या रुग्णालयामध्येच आढळून येतो. मग स्त्री रुग्णालय हे खासगी लॅब झालं की काय ? तेथील डॉक्टरांना जेवणाची डबे ही पुरवतो, परंतु या डब्याबरोबरच आणखी काय- काय पुरवतात अशी चर्चाही ऐकावयास मिळत आहे. बालाघाटावरील मध्य ठिकाण म्हणजे नेकनूर या ठिकाणची बाजारपेठ ही मोठी असल्याने नेकनूर या ठिकाणी लोकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते त्याचबरोबर महिलांना सुविधा देण्यामध्ये हे रुग्णालय अग्रेसर आहे. त्याचबरोबर या ठिकाणी महिलांच्या शस्त्रक्रिया बरोबरच इतरही शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. म्हणून, या रुग्णालयाला चांगले नावलौकिक मिळालेले आहे, परंतु मागील काही महिन्यांपासून रुग्णांच्या रक्त तपासणी बाहेरील खासगी लॅबचालकाकडूनच करून घेतल्या जात असल्यामुळे हजारो रुपयांचा भुर्दंड रुग्णांना येत असल्याने याबाबत रुग्णांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

त्याचबरोबर हा खासगी लॅब वाला रात्रंदिवस अगदी झोपायला पण त्या रुग्णालयांमध्ये असल्याची चर्चा ऐकावयास मिळत आहे. म्हणून, या खाजगी लॅब चालकाने सरकारी रुग्णालयातच आपली लॅब सुरू केली की काय असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. येथील रुग्णांना बाहेरच्या लॅब वाल्याकडून मोठा भुर्दंड सहन करावा लागत असल्याची तक्रार येथील वैद्यकीय अधीक्षक यांना अनेक वेळा करून ही हा प्रकार काही बंद होताना दिसत नाही. मग येथील डॉक्टरांचे आणि खाजगी लॅब चालकाचे काय लागेबांधे आहेत. त्याचबरोबर हा खासगी लॅब चालक येथील डॉक्टरांच्या अगदी पुढे पुढे करताना त्यांना लागणारी वस्तू रुग्णालयात पोच करून देताना जेवणाच्या डब्यापासून ते आणखी काय काय त्यांना नेऊन देतो याबाबत उलट सुलट चर्चा ऐकावयास मिळत आहे.

तरी जिल्ह्याचे सीएस थोरात साहेबांनी याकडे लक्ष घालून रुग्णांची होणारी लूट थांबवावी अशी विनंती रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे.

# आळंदीत ह.भ.प. प्रज्ञाताई पंडित यांचे विष्णू सहस्त्रनाम निरुपण उत्साहात संपन्न



**आळंदी,** दि. 26: सालाबादप्रमाणे कार्तिक महिन्यात होणा-या संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा आणि संत महादेव कास-ार पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त सो.क्ष.कासार समाजातर्फे आळंदी येथे यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. श्री कालिका देवी धर्मशाळेत आयोजित सामूहिक ज्ञानेश्वरी पारायण, का-कडा, प्रवचन, निरूपण आणि कीर्तन या कार्यक्रमांत भाविकांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद लाभला. या सोहळ्यात ठाणे येथील सुप्रसिद्ध निरूपणकार व समाजरत्न पुरस्काराने सन्मानित ह.भ.प. प्रज्ञाताई पंडित यांनी विष्णू सहस्त्रनाम व श्री सूक्त या विषयांवर भक्तिभावपूर्ण निरूपण केले. माऊलींच्या भक्तांनी त्यांच्या या प्रवचनाला तुडुंब प्रतिसाद दिला.


प्रा. प्रज्ञाताई पंडित या विष्णू सहस्त्रनामावर निरूपण करणा-या ठाण्यातील एकमेव विदुषी आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्या प्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्ग या स्तोत्र शिक्षण उपक्रमातून ज्येष्ठ भक्तांना वेद, शास्त्र आणि पुराणातील शंभरहून अधिक स्तोत्रांचे अध्ययन घडवत आहेत. विविध मंदिरे व आस्थापनांत त्या विष्णू सहस्त्रनामाचे निरूपण करीत असून जगभरातील भक्तांना अध्यात्मिक मार्गदर्शन करीत आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष श्रीकांत इटकर आणि उत्सव समितीचे शरदराव भांडेकर, अरुण वेळापुरे, शिवाजी काटकर, महारुद्र वीर, अनिल शेटे, अजय टंकसाळे, संजय डोंगरे, चंद्रशेखर रासने, अतुल कोळपकर, प्रमोद बागेवाडीकर, अविनाश सासवडे व समग्र विश्वस्त मंडळाने केले. श्री.विनायक अष्टेकर, सौ.उज्वलाताई अंदुरे आणि श्री..कमलताई दहातोंडे यांनी पारायण नेतृत्व केलेल्या या निरूपणाचे समन्वयन श्री नेमिनाथ ढोके यांनी केले.

# कांदिवली मध्ये धनगर समाज विकास मंडळाचे स्नेहसंमेलन वधू वर परिचय मेळावा व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात जल्लोषात संपन्न.




**भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम.**

रविवार दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत कांदिवली येथील वांजा ज्ञाती युवक मंडळ सभागृह, इराणी वाडी रोड नंबर १,धनामल शाळेसमोर मुंबई ६७ या ठिकाणी धनगर समाज बांधवांचा स्नेहसंमेलन, वधू वर परिचय मेळावा,व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात जल्लोषात आनंदात साजरा करण्यात आला. सुरुवातीला धनगर समाज विकास मंडळाच्या सर्व आजी माजी पदाधिकारी यांचे हस्ते दीप प्रज्वलन करून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.धनगर समाज विकास मंडळाचे संस्थापक सदस्य व प्रवक्ते, जेष्ठ पत्रकार, कवी, लेखक, गीतकार, सामाजिक कार्यकर्ता भारत कवितके यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले की,ङ्क समाज हिताच्या योजना राबविणे,१०वी,१२वी नंतर कोणती दिशा निवडायची यावर मान्यवरांचे मार्गदर्शन करणे, समाज एक संघ ठेवून समाज बांधवांची आर्थिक शैक्षणिक व इतर क्षेत्रात प्रगती साधणे,या उद्देशाने १९ वर्षांपूर्वी या धनगर समाज विकास मंडळाची स्थापना करण्यात आली होती, दरवर्षी होणा-या स्नेहसंमेलन वधू वर परिचय मेळावा व सांस्कृतिक कार्यक्रमात विभागातील धनगर समाज बांधव, भगिनी,मुले मुली, जेष्ठ नागरिक, मंडळाचे पदाधिकारी यांनी मोठ्या उत्साहात जल्लोषात व आनंदाने यामध्ये सहभागी होतात, मंडळाचे कार्य अतिशय प्रशंसनीय, प्रोत्साहन देणारे, प्रगती पथावर नेणारे असून मंडळातील पदाधिकारी कोणत्याही प्रसिद्धीची लालसा न बाळगता समाज हिताच्या कामासाठी रात्र दिवस झटत असताना दिसतात.समाजातील महिला वर्ग हळदी कुंकू,सण, उत्सव एकत्र येऊन मोठ्या प्रमाणात साजरा करतात,ङ्क या नंतर वधू वर परिचय मेळावा घेण्यात आला त्याचे सूत्र संचालन अजित चांगण यांनी केले, वधू वर यांनी व्यासपीठावर येऊन आपला परिचय दिला.धनगर समाजातील गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनीचा विशेष गुणवत्ता प्राप्त मुला मुलींना, समाज बांधवांना, जेष्ठ नागरिकांना पुष्पगुच्छ व भेट वस्तू देऊन सन्मानित करण्यात आले,या वेळी सदानंद लाळगे, संतोष पिसे, आणि मंडळ अध्यक्ष शिवाजी पिसे यांनी समाज बांधवांना अमूल्य, महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमात लहान मुले मुलीनी वेगवेगळ्या गाण्यावर नृत्य करुन उपस्थित असलेल्यांची मने जिंकली, काही महिला भगिनीं भावगीत, लावणी म्हटली, सांस्कृतिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन उज्वला लाळगे, लक्ष्मी लाळगे, नयना चांगण यांनी केले तर सत्कार प्रसंगी विशाल पिसे, संतोष पिसे,व सदानंद लाळगे यांनी सूत्रसंचालन केले.मल्हारी लाळगे, आप्पासाहेब कुचेकर, सदानंद लाळगे, संतोष पिसे, भारत कवितके, शिवाजी पिसे, सुनिल भगत, नारायण पिसे, अजित चांगण, महेंद्र काळे, मनोज पिसे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर पिसे, मधुकर कुचेकर, बाळासाहेब पिसे, राजेश कुचेकर, सतिश पिसे यांनी विशेष परिश्रम घेतले.











# कवी किरण तोडकर सुर्यवंशी यांच्या संघर्षाच्या वाटेवर या कविता संग्रहाला

## सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्काराने सन्मानीत

**केज/प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी साहित्य चळवळीचे मुख्य केंद्र सरकार मान्य मराठी साहित्य मंडळ यांच्यामार्फत कोरेगाव ( सातारा ) या ठिकाणी ८ वे आखिल मराठी साहित्य संमेलन आणि राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २४ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित केले होते.या संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक डॉ.विनायकराव जाधव यांनी भूषविले.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ कवयित्री ललिता गवांदे आणि रेखा दीक्षित, सन्मानित पाहुणे जेष्ठ लेखक प्राचार्य अनिल बोधे सर, जेष्ठ लेखक सिध्दार्थ कुलकर्णी, मा.अमोल भुजबळ, जेष्ठ कवी सुरेश लोहार हे मान्यवर लाभले व तानाजी चव्हाण, संजय जाधव, संजय तोडकर इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत .तसेच विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ.जयप्रकाश घुमटकर उपस्थित होते.छत्रपती संभाजी महाराज साहित्य नगरी नाव दिलेल्या संमेलनात विविध पुरस्कार सोहळा,परिसंवाद आणि काव्य संमेलनात नहरवाडी रहिमतपूरचे (पलपब पब्लिकेशन संस्था महाराष्ट्र अध्यक्ष) कवी, किरण तोडकर सुर्यवंशी यांनाङ्कराज्यस्तरीय सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्कारानेङ्क गौरविण्यात आले या संपूर्ण गौरवाबद्दल त्यांनी मराठी साहित्य मंडळाचे आभार मानले. व त्यांच्या संघर्षाच्या वाटेवर या कविता संग्रहाच्या आज अखेर दहा हजार प्रती वाचकांपर्यंत पोचल्या आहेत २०13 पासून त्यांच्या या यशामागे नहरवाडी, रहिमतपूर गावातील त्यांचे गुरुवर्य, मित्र परिवार व त्यांचे आईवडील, चुलते,दाजी, मामा, काका,बंधू सर्व पाहुणे परिवार व पलपब पब्लिकेशन संस्थेचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शनिवार ३० नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# इतका लांबलचक ऊस पाहीला होता का? कोल्हापूरातील लांबलचक ऊसाची राज्यात चर्चा

**कोल्हापूरच्या या ऊस उत्पादक शेतकऱ्याची राज्यात चर्चा होत आहे. त्याच्या शेतातील लांबलचक ऊस पाहण्यासाठी बघ्यांची गर्दी होत आहे.**

**आष्टी प्रतिनिधी**

योग्य नियोजन अनब वेळच्या वेळी मशागत केली, तर मुरमाड शेत जमिनीत ऊसाचे विक्रमी उत्पादन घेता येते, हे कोल्हापूरातील लाटवडे गावच्या उद्योजक शंकर पाटील यांनी सिद्ध करून दाखविले आहे. शंकर पाटील यांचे हातकणंगले तालुक्यातील लाटवडे हे गाव आहे. पाटील कोल्हापूरातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक आहेत. पण त्यांना पहिल्यापासूनच शेतीची आवड आहे .त्यामुळेच आजवर त्यांनी द्राक्ष, केळी, पपई अशी प्रयोगशील शेती केल्याचे पाहायला मिळाले आहे. पेठवडगाव येथे पाटील यांची शेती आहे. त्यांच्या शेतातील लांबलचक ऊसाची सध्या राज्यभर चर्चा होत आहे.पाटील यांच्या तीन एकर शेतात हा ५० ते ५५ पेरांचा लांबलचक ऊस वाढला आहे. उसाची शेती परवडत नाही अशी तक्रार त्यांनी विक्रमी उत्पादन घेऊन फोल ठरविली. शेतीचे योग्य



त्या पद्धतीने व्यवस्थापन केले की भरघोस उत्पादन मिळते अनब आर्थिक फायद्याचा गोडवा ही चाखता येतो हे शंकर पाटील यांनी सिद्ध करून दाखवले आहे. नियोजनातून जादा उत्पादन एकरी ४२ हजार ऊस राहावेत, यासाठी अतिरिक्त ऊस काढून उसाची संख्या मोजून घेतली. योग्य पद्धतीने मशागत, खतांची मात्रा वेळच्या वेळी देणे, पाण्याचे योग्य नियोजन याचा सुरेख मेळ घातल्याने पाटील यांना एकरी १२० टन उत्पादनाची हमी मिळाली, असे सचिन पाटील यांनी सांगीतले.

## ५० ते ५५ पेऱ्यांचा लांबलचक ऊस

पारंपरिक पद्धतीने करीत असलेल्या शेतीला फाटा देत त्यांनी आधुनिक पद्धतीने ऊस शेती करून विक्रमी उत्पादन घेण्याचा निर्धार करून त्यांनी ऊसाची लागवड केली. जुलैमध्ये ८६०३२ या जातीची बीज प्रक्रिया करून दोन डोळ्यांच्या कांडीची साडेचार फूट सरी सोडून लावण त्यांनी केली. मुरमाड शेत जमिनीत उगवण ही उत्तम झाली. अनब तब्बल ५० ते ५५ पेरी असणारा लांबलचक वजनदार ऊस सोळा महिन्यात तयार झाला. पाटील यांना गुंठ्याला तीन टन उत्पादन घेण्यात यश आले आहे. जाड पेरी असलेला लांबलचक वजनदार ऊस तीन ते चार ठिकाणी तोडूनच त्याची मोळी बांधावी लागतेय. एकसारखा तीन एकरातील हा ऊस तब्बल ३६० टन उत्पादन देणारा ठरणार आहे. यासाठी त्यांना ऊस शेतीतज्ज्ञ सचिन पाटील यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# कवी बाळासाहेब तोरस्कर साहित्य सेवा गौरव पुरस्काराने सन्मानित

**डोंबिवली /प्रतिनिधी** : ठाणे येथील जेष्ठ कवी , लेखक समाजसेवक, पत्रकार प्रा. बाळासाहेब तोरस्कर यांना लेखन अनब मी साहित्य समुह परिवार कोल्हापूर यांच्या वतीने प्रा. अशोक बागवे यांच्या हस्ते साहित्य सेवा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सुप्रसिद्ध साहित्यिक सतीश सोळांकुरकर , कवी विजय जोशी, जेष्ठ कवी, लेखक प्रा. शरदचंद्र काकडे, समाजसेवक विरसेन साळोखे आदी मान्यवर उपस्थित होते. हा सोहळा वरद सभागृह गणेश मंदिर संस्थान , फडके रोड डोंबिवली पूर्व येथे नुकताच लेखन अनब मी साहित्य समुहाच्या दुस–या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आला होता. तोरस्कर हे साहित्यिक , सांस्कृतिक , सामाजिक, पत्रकारिता व फार्मास्युटिकल क्षेत्रात गेली अनेक वर्षे कार्यरत असून ते अनेक साहित्यिक व सामाजिक संस्थाचे संस्थापक



पदाधिकारी आहेत. ते साहित्य संपदा दिवाळी अंकाचे निवासी संपादक, कृषिराज दिवाळी अंकाचे सहसंपादक, जायंट गृप ऑफ कोल्हापूर मेट्रो चे माजी अध्यक्ष व कौन्सिल मेंबर, राष्ट्रीय शिक्षक संचेतनाचे राष्ट्रीय प्रवक्ते, भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष, काव्य प्रेमी शिक्षक मंचचे राज्य सल्लागार समिती सदस्य आदि पदावर कार्यरत आहेत.त्यांचे २ कविता संग्रह प्रकाशित असून त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तोरस्कर यांना त्यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल अनेक राष्ट्रीय , आंतरराष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या निवडी बद्दल समाजातील सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ( फोटो कॅप्शन : प्रा. अशोक बागवे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना प्रा. बाळासाहेब तोरस्कर, सोबत डावीकडून विजय जोशी , प्रा. शरदचंद्र काकडे, सतिश सोळांकूरकर, विरसेन साळोखे आदी. )

## संविधान दिनी गांधी बाल मंदिर हायस्कूलमध्ये व्याख्यान आयोजन..



२६ नोव्हेंबर संविधान दिन दरवर्षी साजरा केला जातो यावर्षी गांधी मंदिर हायस्कूल कुर्ला या ठिकाणी संविधान दिन व मुंबई हल्लात शहीद झालेल्या वीर जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी तिमिरातून तेजाकडे या संस्थेचे प्रमुख श्री. सत्यवान रेडकर सर यांचे स्पर्धा परीक्षांवर आधारित व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. रेडकर सरांनी सर्व सरकारी स्पर्धा परीक्षा याची इत्यंभूत माहिती विद्यार्थ्यांना गमतीशीर पद्धतीने समजावून सांगितली यावेळी इयत्ता आठवी नववी दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यानाचा मनमुराद आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. स्पर्धा परीक्षेत पुढे आम्ही यशस्वी होऊ असे वचनही त्यांनी रेडकर सरांना दिले. सदर कार्यक्रमात शाळेतील सर्व शिक्षक, पर्यवेक्षक उपस्थित होते. सदर कार्यक्रमात मान्यवरांचा सत्कार मुख्याध्यापक श्री अनिल पांचाळ सर यांनी केला .

# लेखन अन मी साहित्य समुहाचा वर्धापन पुस्तक प्रकाशन व कविसंमेलनाने संपन्न कवींनी समाजमनाचे भान ठेवावे प्रा. बाळासाहेब तोरस्कर

**डोंबिवली** : आशय, विषय व अभिव्यक्ती म्हणजे कविता,ती अंतरातुन येते.कविता हा समाज मनाचा आरसा असतो म्हणून कवींनी समाजमनाचे भान ठेवावे.रमेश पाटील यांच्या सारख्या तरूण कवींनी एकत्र येऊन लेखन अनब मी साहित्य समुह स्थापन करून नवोदित कवी कवयित्री व लेखक यांना व्यक्त होण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली ही गोष्ट कौतुकास्पद आहे असे उद्गार प्रा. बाळासाहेब तोरस्कर यांनी काढले. लेखन अनब मी साहित्य समुहाच्या दुस–या वर्धापन दिनानिमित्त कवयित्री सौ. सोनाली फडके यांच्या सावळाई प्रीत कविता संग्रह व लेखक रमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अवती भवती लेख संग्रह या पुस्तकांचे प्रकाशन , साहित्यिक व सामाजिक सेवा गौरव पुरस्कार व निमंत्रितांचे कविसंमेलन वरद सभागृह , गणेश मंदिर संस्थान फडके रोड डोंबिवली पूर्व येथे आयोजित करण्यात आले होते त्यावेळी ते अध्यक्ष पदावरून बोलत होते. या कार्यक्रमाचे विशेष अतिथी प्रा. अशोक बागवे यांनी आपल्या भाषणात सांगितले की व्यक्त होण्याची असोशी असणे हा कवी स्वभाव असतो तसा कवयित्री सोनाली फडके यांच्यात आहे. आजूबाजूचे वास्तव मांडताना तो फक्त एकट्याच्या भावना व्यक्त न करता इतरांच्या भावनांही तो व्यक्त करतो व अशी कविता मग सर्वांना आपलीशी वाटते असेही ते पुढे म्हणाले. प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध कवी व लेखक सतिश सोळांकूरकर



यांनी कविता संग्रहावर आपले विचार व्यक्त केले.कवी व गझलकार विजय जोशी, जेष्ठ कवी लेखक प्रा. शरदचंद्र काकडे,समाजसेवक विरसेन साळोखे ,प्रकाशिका रोहिणी वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. साहित्य सेवा पुरस्काराचे वितरण प्रा. अशोक बागवे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा.अशोक बागवे, कवी सतिश सोळांकूरकर, प्रा. बाळासाहेब तोरस्कर, कवी विजय जोशी , प्रा. शरदचंद्र काकडे व समाजसेवक विरसेन साळोखे यां मान्यवराना पुरस्कार प्रदान करण्यात आले. सोहळ्याचे सौ. सोनाली फडके व श्रीशैल सुतार हे स्वागताध्यक्ष होते. या सोहळ्याचे आयोजन समुह प्रशासक कवी रमेश पाटील व सौ सोनाली फडके यांनी केले होते . रोहिणी पब्लिकेशन यांनी पुस्तके प्रकाशित केली आहेत. कविसंमेलनामध्ये राज्यभरातून २० कवी व कवयित्रींनी सहभाग नोंदवला.सर्व कवीं/कवयित्रिंना मेडल व सन्मान चिन्ह मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्र संचालन श्रीशैल सुतार व रोहिणी जाधव यांनी केले.( फोटो कॅप्शन: सौ सोनाली फडके यांच्या सावळाई प्रीत कविता संग्रहातचे प्रकाशन करताना डावीकडून प्रकाशिका रोहिणी वाघमारे. विजय जोशी, शरदचंद्र काकडे, प्रा. बाळासाहेब तोरस्कर,प्रा. अशोक बागवे, सतिश सोळांकूरकर , विरसेन साळोखे आदी मान्यवर )

# कांदिवली येथे भारतीय संविधान दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर मनपा रुग्णालयाच्या आवारात संविधान दिन संपन्न.

**कांदिवली पश्चिम** येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मनपा सर्वसाधारण रुग्णालयाच्या आवारात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्ण पुतळ्याजवळ पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट व्दारा सालाबादप्रमाणे यंदाही संविधान दिन साजरा करण्यात आला.यावर्षी अमृत महोत्सव भारतीय संविधान दिन म्हणून साजरा करण्यात आला, यावेळी उत्तर मुंबई चे माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार संजय उपाध्यक्ष, आमदार मनिषा चौधरी, विजय भाई गिरकर,गणेश खणकर, बाळा तावडे, यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्ण पुतळ्यास विनम्र अभिवादन केले, धम्म प्रार्थना म्हटली, त्यानंतर सामूहिक रित्या संविधान प्रास्ताविकाचे वाचन करण्यात आले,या प्रसंगी आमदार संजय उपाध्यक्ष, योगेश सागर, मनिषा चौधरी, विजय भाई गिरकर, गोपाळ शेट्टी, यांनी




जमलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले,



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे गुण गौरव केले.या संविधान दिनाच्या निमित्ताने सर्व मान्यवरांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी मा.खासदार गोपाळ शेट्टी, आमदार संजय उपाध्यक्ष, आमदार योगेश सागर, आमदार मनिषा चौधरी, गणेश खणकर, बाळा तावडे कमलेश यादव, प्रियांका मोरे,लिना देहरकर, प्रतिभा गिरकर, पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट चे अध्यक्ष संजय बावीस्कर, संदीप जाधव, पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट चे अध्यक्ष संजय बावीस्कर, गजानन गव ई,पत्रकार भारत कवितके, रुग्णालयीन कर्मचारी, सुरक्षा रक्षक, रुग्णांचे नातेवाईक,व इतर कार्यकर्ते, पुरुष व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## गिरीश चौगुले याची शालेय राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड प्रतिनिधि -जगदीप वनशिव



पुणे – क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद पुणे –विभागीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२४–२५. विभागीय क्रीडा संकुल येरवडा पुणे येथे पार पडलेल्या , सदर विभागीय स्पर्धेत कोल्हापूर पुणे सांगली सातारा सोलापूर अशा अनेक जिल्हातून खेळाडूंनी सहभाग घेतला होता . सदर स्पर्धेत सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत मंगळवेढ्यातील गिरीश चौगुले यांनी प्रथम क्रमांक मिळवित अद्वितीय कामगिरी केली व तालुका व जिल्ह्यचे महाराष्ट्र राज्यात नाव उंचाविले त्यामुळे त्याचे अनेक राजकीय , सामाजिक संस्था व विविध क्षेत्रातील खेळाडूनी अनेक लोकांकडून त्याचे कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे . त्याचे महाराष्ट्र राज्य धुळे या ठिकाणी होणा–या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी त्याची निवड झाली असून त्याला भरत कराटे अकॅडमी सोलापूर जिल्हाचे प्रतिनिधी सेन्सई–विश्वजीत हेंबाडे यांचे मार्गदर्शन मिळाले त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रमुख शिहान – रवींद्र सूर्यवंशी यांनी पुढील. वाटचालीस शुभेच्छा दिल्या. असून पंढरपूर मंगळवेढा आमदार समाधान दादा आवताडे यांनी मनस्वी शुभेच्छा दिल्या तसेच ग्रामस्थांनी भरभरून कौतुक केले असून गावोगावी . त्यांचा सत्कार होत आहे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com